जा.क्र. आपोआ./प.प्रा.वि./९२८७/१९
दिनांक: २० / ०३ /२०१९

# प्रेस नोट

आरोपी नामे सुनिल उर्फ चॉकलेट किशोर डोकेफोडे याने २) नवनाथ बाळासाहेब वाल्हेकर, ३) योगेश राजेंद्र जांभळे, ४) अभिजीत गणेश कडू, ५) नितीन उर्फ मेटया अंकूश मेटकरी, ६) अतिष सतिश माळी, ७) प्रकाश उर्फ पप्पू अरूण गायकवाड, ८) सौरव रावसाहेब आढाव, ९) राजेश रावसाहेब आढाव, १०) अक्षय हरिभाऊ आंबवले, ११) सुरज उर्फ सुरज्या बबन कोळगे, १२) अभिजीत राम कदम, १३) भिमराज राजु कांबळे, १४) समीर राऊत नाटेकर, १५) अविनाथ उर्फ गौरव सुनिल देवकुळे, १६) शुभम एकनाथ खाडे, १७) सतिश शाम माळी, १८) योगेश उर्फ नुन्या शशिकांत पवार, १९) दिपक शेंडी उर्फ दिपक दत्तात्रय खिरीड यांचेसोबत गैरकायद्याची मंडळी जमवून स्वतःच्या संघटीत गुन्हेगारी टोळीच्या वर्चस्वासाठी कट करून कोयत्याने वार करून व लाथा बुक्यांनी मारून निलेश वाडकर यास जिवे ठार मारले. तसेच अमोल कदम, गणेश जाधव व सुजित बडंबे यांना गंभीर जखमी करून जिवे मारण्याचा प्रयत्न केला म्हणून नमुद आरोपींविरूध्द दत्तवाडी पोलीस स्टेशन गु.र.नं. गु.र.नं.७५/२०१९, भा.द.वि. कलम १४३, १४७, १४८, १४९, ३०२, ३०७, ३२४, १२० (ब), आर्म ॲक्ट कलम ३ (२५), ४ (२५), क्रि.लॉ अमेंडमेंट ॲक्ट कलम ७, म.पो.का. कलम १४२ व ३७ (१) (३) सह १३५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. .

आरोपी नामे सुनिल उर्फ चॉकलेट किशोर डोकेफोडे , वय २२ वर्षे, रा. झगडे आळी, घोरपडे पेठ, पुणे हा टोळी प्रमुख असुन त्याचे वरील साथीदार हे सातत्याने दहशत व हिंसाचारांचा अवलंब करून आपल्या टोळीस आर्थिक व टोळीचे वर्चस्व प्रस्थापीत करण्यासाठी त्याने एकट्याने व संयुक्तपणे खुन, खुनाचा प्रयत्न, घातक हत्यारांनी गंभीर दुखापत, दुखापत, जबरी चोरी, बेकायदेशीर जमाव जमवून मारामारी, घरफोडी, दरोड्याचा प्रयत्न, जिवे मारण्याच्या धमकी देणे, बेकायदेशीररित्या शस्त्र जवळ बाळगणे इ. सारखे गुन्हे सातत्याने करीत आहेत.

सदर आरोपींच्या बेकायदेशीर कृत्यांना व संघटीत गुन्हेगारी व त्यांच्या दहशतीस आळा बसावा म्हणुन सदरील गुन्ह्यास महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण कायदा १९९९ चे कलम ३ (१) (i) (ii), ३ (२) व ३ (४) चा अंतर्भाव करण्यास मंजूरी देण्यात आली असून सदरील गुन्ह्याचा तपास सहा पोलीस आयुक्त, सिंहगड रोड विभाग, पुणे शहर हे करीत आहेत.

२०/३/१९

( रविंद्र सेनगांवकर )
अपर पोलीस आयुक्त,
पश्चिम प्रादेशिक विभाग, पुणे शहर.